**ठळक बातम्या**

- दिवाळी पाडव्या निमित्त राज्यभरात उत्साहाचं वातावरण
- राज्याची सद्यस्थिती बदलण्यासाठी सत्ताबदलाशिवाय पर्याय नसल्याचं ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं मत
- विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं रुसवे फुगवे सुरूच

**आणि**

- भारत - न्यूझीलंड कसोटी सामन्यात आजही दिवसभरात १५ गडी बाद, पहिल्या डावाअखेर मोठी आघाडी घेण्याची संधी भारतानं गमावली

**<><><><><>**

आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा, बलिप्रतिपदा अर्थात दिवाळी पाडवा. हा दिवस साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मानला जातो. त्यामुळे चांगल्या उपक्रमांची सुरुवात किंवा महत्त्वाची खरेदी आज केली जाते. घर, वाहन किंवा आभुषणं खरेदीसाठी आजचा मुहूर्त साधण्याकडे बहुतेकांचा कल असतो. आज बाजारपेठांमध्ये भेटवस्तू, तसंच मोबाईल फोन्स, आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदीही मोठ्या प्रमाणात होत आहे. मोठी दुकानं, मॉल्स, घाऊक बाजारपेठा, सराफकट्टे गजबजले आहेत. याशिवाय अनेकांनी ऑनलाईन खरेदीलाही पसंती दिली आहे.

विक्रम संवत २०८१ ला आजपासून प्रारंभ झाला. देशाच्या अनेक भागात हा नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. गुजराती नववर्षानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर शुभेच्छा दिल्या. हे नवीन वर्ष सर्वांसाठी आनंद, सफलता, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, अशी कामना त्यांनी व्यक्त केली आहे. आज

देशभरात गोवर्धन पूजा साजरी झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गोवर्धन पूजेनिमित्त समाजमाध्यमावरून देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबईत उद्या रेल्वेच्या मुख्य मार्गावर आणि हार्बर मार्गावर दिवसभर कोणाताही मेगाब्लॉक नसल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे. उद्या भाऊबीज साजरी करणाऱ्या मुंबईकरांचा प्रवास सुरळीत होणार आहे.

पंरतु आज मात्र मुंबईची लाईफलाईन मानली जाणारी लोकल सेवा ऐन दिवाळीच्या दिवसात विस्कळीत झाली होती.

**<><><><><>**

गेल्या अनेक वर्षांपासून एकत्र दिवाळी साजरी करण्याची बारामतीच्या पवार कुटुंबियांची परंपरा आज खंडीत झाली. बारामतीमध्ये आज दिवाळी पाडवा साजरा झाला, मात्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा आणि उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचा वेगवेगळा पाडवा उत्सव पार पडला. शरद पवार यांचा पाडवा गोविंद बागेत तर अजित पवार यांचा पाडवा काटेवाडीत पार पडला.

**<><><><><>**

राज्याची सध्याची स्थिती गंभीर असून ती बदलण्यासाठी सत्ताबदलाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्याला पूर्वपदावर आणण्याची ताकद असणाऱ्यांना जनतेनं आपला कौल द्यावा आणि ती ताकद फक्त महाविकास आघाडीत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं आहे.

प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा, राज्याची आर्थिक स्थिती बिघडल्याबाबतचा निष्कर्ष गंभीर आहे. सत्ताधाऱ्यांनी वेळीच याकडे लक्ष न दिल्याचा हा परिणाम आहे, असा आरोप पवार यांनी केला. केंद्र सरकारच्या अर्थ विभागाच्या मानांकनात जे राज्य पहिल्या क्रमांकावर होतं, ते आज पहिल्या पाचातही दिसत नाही, अशी टीका त्यांनी केली.

सध्या राज्यात विमानाने फॉर्म पोहोचवल्याच्या गोष्टी ऐकायला मिळत असल्याचं सांगून, सत्ताधारी पक्षाकडून उमेदवारांना अर्थसहाय्य देण्यासाठी पोलीस दलाच्या गाड्या वापरल्या जात आहेत, असं त्या विभागातल्या अधिकाऱ्यांकडून ऐकायला मिळत आहे, असा आरोप शरद पवारांनी केला.

**<><><><>**

सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाले असल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे. येत्या ६ नोव्हेंबरला काँग्रेस पक्ष निवडणूक जाहीरनाम्यात  गॅरंटी जाहीर करणार असल्याचं महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी आज मुंबईत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. राज्याचे माजी मंत्री अनिस अहमद आज मुंबईत आयोजित कार्यक्रमात काँग्रेस पक्षात परतले.

**<><><><>**

महिलांच्या सन्मानाबाबत शिबवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं भूमिका जाहीर करावी अशी मागणी शिवसेनेच्या मुंबादेवी मतदार संघातील उमेदवार शायना एन.सी यांनी केली आहे. त्या मुंबईत वार्ताहरांशी बोलत होत्या. खासदार अरविंद सावंत यांनी त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत दिलगिरी व्यक्त केली, मात्र त्यानंतर

खासदार संजय राऊत यांनी ही माफी नाही असं म्हणत सावंत यांचं समर्थन केलं, त्यावरून शायना एन.सी. यांनी ही मागणी केली आहे.

**<><><><>**

वाशिम जिल्ह्यात भाजपानं युतीचा धर्म पाळला नाही तर,  शिवसेना सुद्धा जिल्ह्यात युतीचा धर्म पाळण्यास बांधील राहणार नाही असा इशारा वाशीमचे युवा सेना जिल्हाध्यक्ष रवी भांदुर्गे यांनी दिला आहे. ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><>**

भाजपाचे बंडखोर उमेदवार गोपाळ शेट्टी यांनी बोरीवली विधानसभा मतदारसंघातून माघार घेणार नसल्याचं स्पष्ट केलं. त्यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट असल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><>**

नवी मुंबईचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. कौशिक यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या मुंबईतल्या सागर या निवासस्थानी भेट घेतली, आणि त्यांच्या उपस्थितीच भाजपात प्रवेश केला.

**<><><><>**

रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या विदर्भातल्या कार्यकर्त्यांनी या विधानसभा निवडणुकीत भाजपाला सहकार्य करणार नसल्याचं जाहीर केलं आहे. पक्षाचे राष्ट्रीय संघटन सचिव भूपेश थुलकर यांनी यासंदर्भात पक्षाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना पत्र पाठवलं आहे. भाजपासोबत गेल्या दहा वर्षांपासून युती असतानाही, रिपब्लिकन पक्षाला सन्मान

मिळत नाही, भाजपानं लोकसभा आणि विधानसभेतही पक्षाला एकही जागा सोडली नाही, अनेक महामंडळांवरच्या नियुक्त्या, राज्यपाल नियुक्त आमदार यातही पक्षाचा विचार केला गेला नाही. यामुळे रिपब्लिकन समर्थकांमध्ये नाराजी असल्याचं त्यांनी या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या जव्हार इथल्या काळमांडवी धबधब्यावर पर्यटनासाठी गेलेल्या दोन जणांचा बुडून मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या गोरेगाव भागातल्या सिद्धार्थ नगर परिसरात एका ३१ मजली रहिवासी इमारतीला आज दुपारी लागलेल्या आगीत दोन जण गंभीररीत्या भाजले. या दोघांवर उपचार सुरू आहेत आणि दोघांची प्रकृती गंभीर आहे.

**<><><><><>**

देशभरात पेन्शन विभाग आणि ॲम्प डिजिटल जीवन प्रमाणपत्र योजना येत्या १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान राबवण्यात येत असून पहिल्याच दिवशी १ लाख ८० हजारांहून अधिक पेन्शनधारकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.
या योजनेसाठी पेन्शनधारक घरच्याघरी स्मार्टफोन कॅमेराचा वापर करून फेस स्कॅन करतील आणि हे प्रमाणपत्र जमा करू शकतील.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात, आज दुसऱ्या दिवशीही दोन्ही संघांचे मिळून १५ गडी बाद झाले. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा न्यूझीलंडनं आपल्या दुसऱ्या डावात ९ बाद १७१ धावा केल्या होत्या. भारताच्या वतीनं रविंद्र जडेजा यानं न्यूझीलंडचे ४ तर रविचंद्रन अश्विन यानं ३ गडी बाद केले. न्यूझीलंडच्या वतीनं यंग वील यानं सर्वाधिक ५१ धावा केल्या. आज सकाळी भारतानं आपला पहिला डाव, ४ बाद ८६ धावांवरून पुढे सुरू केला. काल नाबाद असलेल्या शुभमन गील आणि ऋषभ पंत यांनी पाचव्या गड्यासाठी ९६ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. गील यानं ९० तर पंत यानं ६० धावांची खेळी केली. मात्र पंत बाद झाल्यानंतर भारताचे उर्वरीत फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले आणि भारताचा पहिला डाव २६३ धावांत आटोपला. त्यामुळं भारताला केवळ २८ धावांची आघाडी मिळाली. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं भारताचा निम्मा संघ तंबूत पाठवला.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज सुद्धा दुपारनंतर मेघगर्जनेसह पावसानं हजेरी लावली. गेले काही दिवस सतत पडत असलेल्या पावसानं कापणीला आलेल्या भातपिकाचं नुकसान झालं आहे. फोंडाघाट इथं वीज पडून गुरुवारी रात्री चार पशुधन दगावले आहेत. **काही ठिकाणी वादळी वाऱ्यांमुळे** घरांवरचे पत्रे उडून गेले आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, गेल्या काही वर्षांमध्ये सायबर फसवणूक, ऑनलाइन फसवणूक, डीप फेक अशा प्रकारांना अनेक जण बळी पडतात. अनेकांच्या खात्यातून लाखो

रुपये लंपास केले जातात. आता त्यात डिजिटल अरेस्ट हा एक नवा प्रकार समोर येतोय. या सर्व प्रकारच्या फसवणुकीपासून स्वतःचं रक्षण कसं करायचं, फसवणूक झाल्यावर तक्रार कुठे करायची या सर्वांची माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या सायबर विभागाचे पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे आज आपल्याला देणार आहे. आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर रात्री सव्वा ८ ते पावणे ९ दरम्यान ही मुलाखत आपल्याला ऐकता येईल.

**//<><><><><>//**